सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९

# मुंबईचा जनावरांच्या रोगांबाबत अधिनियम, १९४८

( दिनांक १३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला )

**Bombay Act No. LIX of 1948**

# The Bombay Diseases of Animals Act, 1948

*( As modified upto 13th November 2006. )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६.

[ किंमत : रुपये ५ - ०० ]

# मुंबईचा जनावरांच्या रोगांबाबत अधिनियम, १९४८.

## अनुक्रमणिका


उद्देशिका, पृष्ठे

कलमें.

प्रकरण एक

प्रारंभिक

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, .. | १ |
| २. | व्याप्ती व प्रारंभ .. | १ |
| ३. | व्याख्या. .. | २ |
| ४. | पशुवैद्यांची व निरीक्षकांची नेमणूक .. | २ |
| ५. | पशुवैद्य व निरीक्षक हे, लोकसेवक असणें .. | ३ |
| ५क. | विवक्षित क्षेत्रात रोगांचे निर्मूलन करणे .. | ३ |

प्रकरण दोन

अनुसूचित रोगांस प्रतिबंध व त्यांवर नियंत्रण.

| | | |
|---|---|---|
| ६. | संसर्गदूषित जनावरे, वगैरे यांची आयात, निर्यात किंवा परिवहन करणे, ती विकण्यासाठी बाजार, जत्रा वगैरे भरवणे त्यांचा व्यापार करणें या गोष्टींस प्रतिषेध करण्याचा किंवा त्यांचे नियमन करण्याचा अधिकार. .. | ४ |
| ७. | निरोध-स्थाने स्थापन करणे. .. | ५ |
| ८. | संसर्गदूषित जनावरांना अलग करण्याचा आणि त्यांची तपासणी करण्याचा अधिकार. .. | ५ |
| ९. | जनावरांची तपासणी करण्याचा पशुवैद्यांचा अधिकार. .. | ६ |
| १०. | मारून टाकण्यात आलेल्या जनावरांबद्दल नुकसानभरपाई. .. | ६ |
| ११. | संसर्गदूषित खाजगी जागा जाहीर करणे आणि पशुवैद्याकडून अशा जागांची तपासणी.. | ६ |
| १२. | संसर्गदूषित सार्वजनिक जागा जाहीर करणे. .. | ७ |
| १३. | संसर्गदूषित क्षेत्रे जाहीर करण्याचा राज्य सरकारचा अधिकार. . | ७ |
| १४. | संसर्गदूषित क्षेत्रांतून किंवा प्रतिषिध्द जागेतून लैसेन्सवाचून जनावरे व इतर वस्तू काढून नेणे. . | ८ |
| १५. | जनावरे वगैरे संसर्गदूषित क्षेत्रांत आणण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार. . | ८ |
| १६. | जलयाने व वाहने साफ व रोगजंतुरहित करणे. . | ८ |
| १७. | संसर्गदूषित जागा जलयाने किंवा वाहने रोगजंतुरहित करण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार. . | ९ |
| १८. | मरणोत्तर परीक्षा करण्याचा पशुवैद्याचा अधिकार. . | ९ |
| १९. | अनुसूचित रोगांची खबर देणे हे व्यक्तीचे कर्तव्य. . | ९ |

अनुक्रमणिका--चालू

| कलमें, | | पृष्ठे |
| --- | --- | --- |
| १९क. | संसर्गदूषित जनावरे अलग ठेवणे हे, अशी जनावरे ताब्यात असलेल्या व्यक्तीचे कर्तव्य असेल. .. | ९ |
| २०. | संसर्गदूषित जनावरें ठेवण्यास किंवा चरू देण्यास प्रतिबंध. .. | ९ |
| २१. | संसर्गदूषित जनावरे बाजार वगैरे यात आणण्यास प्रतिषेध. .. | ९ |
| २२. | संसर्गदूषित जनावरांची मृत शरीरे नदी वगैरे यात टाकण्यास प्रतिषेध. .. | ९ |
| २३. | जनावराचे मृत शरीर वैध अधिकारावाचून उकरून काढण्यास प्रतिषेध. .. | १० |
| २४. | प्रवेश व तपासणी करण्याचे अधिकार. .. | १० |
| २५. | आदेशांची अंमलबजावणी व खर्चाची वसुली. .. | १० |
| २६. | जनावर संसर्गदूषित आहे किंवा नाही त्याविषयी निर्णय देण्याचा पशुवैद्याचा अधिकार. .. | १० |
| २७. | शास्ती. .. | १० |
| २८. | संसर्गदूषित जनावरांचे मृत शरीर नदी वगैरे यात टाकण्याबद्दल शास्ती. - | ११ |
| २९. | त्रास देण्यासाठी प्रवेश किंवा तपासणी करण्याबद्दल किंवा जनावर धरण्याबद्दल शास्ती. .. | १२ |
| ३०. | निरीक्षकास व पशुवैद्यास सहाय्य करणे अधिका-यांस भाग असणे. .. | १२ |
| ३१. | अटक करण्याचा व जप्त करण्याचा अधिकार. .. | १२ |
| ३२. | फौजदारी न्यायाधिशाचा क्षेत्राधिकार. .. | १२ |
| ३३. | नुकसानभरपाई मागण्यास मनाई. .. | १२ |
| ३४. | अधिका-यांनी सरकारच्या आदेशास अधीन राहून काम करणे. .. | १२ |
| ३५. | या अधिनियमाअन्वये केलेल्या कारवाईचे संरक्षण. .. | १३ |
| ३६. | नियम. .. | १३ |
| ३७. | राज्य सरकाचा अनुसूचीत वाढ करण्याचा अधिकार. .. | १३ |
| ३८. | सन १९३४ चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम रद्द करणे आणि बचाव. | १३ |
| | अनुसूची | १४ |

# सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९[१]

[ जनावरांच्या सांसर्गिक रोगांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८. ] *

[ ३० नोव्हेंबर, १९४८. ]

या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांन्वये अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत : —

विधी अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम ९.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ८.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

[२] [ जनावरांना होणा-या सांसर्गिक रोगांचे निर्मूलन करण्यासाठी, त्यास प्रतिबंध करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, [३] [ जनावरांना होणा-या सांसर्गिक रोगांचे निर्मूलन करण्यासाठी, त्यास प्रतिबंध करण्यासाठीं व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरतूद ] करणे इष्ट आहे; त्याअर्थी, यान्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत आला आहे : —

## प्रकरण एक

प्रारंभिक.

**मुंबई अधिनियम क्रमांक ५९[१]**

१. या अधिनियमास, [४] [ मुंबईचा जनावरांच्या रोगांबाबत ] अधिनियम, १९४८ असे म्हणावे]. संक्षिप्त नाव.

२. (१) हा अधिनियम संपूर्ण [५] [ महाराष्ट्र राज्यास ] लागू आहे. व्याप्ती व प्रारंभ.

(२) [६] [ कलम १, हे कलम आणि कलम ५-क ] ताबडतोब अंमलात येईल. [७] [ राज्य ] सरकारास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, या अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदींपैकी सर्व किंवा कोणतीही तरतूद अशा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासनाचे राजपत्र, १९४८, भाग पाच, पृ. ४७५ पहावे.

२. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कलम ३ व ४ द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या क्र. ३ कलम ३ व ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ६ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ६(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* महाराष्ट्र राज्याच्या ज्या भागांस लागू नव्हता, त्या भागास सन १९६० चा महा. अधि. क्र. ३ त्याच्या प्रारंभानंतर लगेचच याद्वारे लागू करण्यात येत आहे (सन १९६० चा महा. अधि. क्र. ८ कलम २ अन्वये).

येईल अशा क्षेत्रांत, निर्दिष्ट करण्यात येतील अशा अनुसूचित रोगांच्या संबंधात व निर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास अंमलात येतील. तसेच त्यास, तशाच अधिसूचनेद्वारे, असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, अशा तरतुदी अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून कोणत्याही क्षेत्रांत अंमलांत असण्याचे बंद होईल.

व्याख्या. ३. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुध्द कांही नसल्यास, या अधिनियमात,

(क) " जनावर " याचा अर्थ, कोणतेही पाळीव जनावर किंवा पक्षी किंवा बंधनांत ठेवलेले कोणतेही जनावर, किंवा पक्षी, असा आहे;

(ख) [१] [ " निर्यात करणे " याचा अर्थ, डोमिनियन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणे असलेले शुल्क-सीमांत न ओलांडता इतर रीतीने राज्याबाहेर नेणे, असा आहे ;

(ग) " आयात करणे " याचा अर्थ, डोमिनियन सरकारने व्याख्या केल्याप्रमाणे असलेले शुल्क-सीमांत न ओलांडता इतर रीतीने राज्यांत आणणे, असा आहे ;

(घ) " संसर्गदूषित जनावर " यासंज्ञेचा अर्थ, ज्या जनावरास कोणताही अनुसूचित रोग झाला आहे किंवा ज्या जनावरास असा रोग झालेल्या जनावरांचा नुकताच संपर्क घडला असेल किंवा जे अशा जनावरांच्या निकट सानिध्यात आले असेल असे जनावर असा समज आहे ;

(ङ) " निरीक्षक " याचा अर्थ, कलम ४ अन्वये नेमलेला निरीक्षक असा आहे ;

(च) " विहित " [ याचा अर्थ, कलम ३६ अन्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले असा आहे ;

(छ) " नियम " याचा अर्थ, कलम ३६ अन्वये केलेले नियम असा आहे ;

(ज) " अनुसूचित रोग " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचित निर्दिष्ट केलेला कोणताही रोग, असा आहे ;

(झ) " परिवहन " याचा अर्थ, [२] [ महाराष्ट्र राज्यात ] एका जागेहून दुस-या जागी हलविणे असा आहे ;

(ञ) " पशुवैद्य " याचा अर्थ, कलम ४ अन्वये नेमलेला पशुवैद्य असा आहे ;

पशुवैद्यांची व निरीक्षकांची नेमणूक. ४. (१) [३] [ राज्य ] सरकारास, [४] [ किंवा त्याच्या विभागातील कमिशनरास राजपत्रातांत प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रासाठी एखाद्या व्यक्तीची पशुवैद्य म्हणून नेमणूक करण्याचा तसेच ज्या क्षेत्रांत त्याने या अधिनियमान्वये पशुवैद्याचे अधिकार चालविले पाहिजेत व कर्तव्ये बजाविली पाहिजेत ते क्षेत्र निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे.

---

१. सन १९६० चा महा. अधि. क्र. ३ कलम ७ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी खंड (ख) व (ग) हे दाखल करण्यात आले.

२. सन १९६० चा महा. अधि. क्र. ३, कलम ७ (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९५८ चा मुंबई-८, अनुसूचीद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) [1][राज्य] सरकारास, [2][किंवा त्याच्या विभागातील कमिशनरास] राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांकरिता, एखाद्या व्यक्तीची निरीक्षक म्हणून नेमणूक करण्याचा आणि ज्या क्षेत्रांत त्याने या अधिनियमाअन्वये निरीक्षकाचे अधिकार चालविले पाहिजेत व कर्तव्ये बजाविली पाहिजेत ते क्षेत्र निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे.

(३) पशुवैद्याने, ज्या क्षेत्रासाठी त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या क्षेत्रांत, या अधिनियमाअन्वये निरीक्षकास जे अधिकार चालविता येतील ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत आणि असे अधिकार त्यास, पशुवैद्य म्हणून त्याचे जे अधिकार असतील त्याबरोबर चालविता येतील.

पशुवैद्य आणि निरीक्षक हे लोक-सेवक असणे.

**५.** या अधिनियमान्वये नेमण्यात आलेला प्रत्येक पशुवैद्य व प्रत्येक निरीक्षक हा, भारतीय दंड संहिता १८९० चा ४५ कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे समजले पाहिजे.

## प्रकरण दोन

## अनुसूचित [3][रोगांचे निर्मूलन करणे त्यास प्रतिबंध करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे]

विवक्षित क्षेत्रात रोगांचे निर्मूलन करणे.

[4][ "**५ क.** (१) कोणत्याही अनुसूचित रोगाचे शक्य तेथवर निर्मूलन करण्याकरिता राज्य सरकारास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, —

(क) कोणतेही स्थानिक क्षेत्र हे निर्मूलन क्षेत्र म्हणून जाहीर करण्याचा अधिकार असेल आणि त्यानंतर अशा क्षेत्रांत अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही वर्गाची किंवा वर्गांची जनावरे तीत उल्लेखिलेल्या पध्दतीने रोगसंसर्गमुक्त, करण्यात येतील, तसेच ओळख पटण्याच्या कारणांसाठी त्या जनावरांवर विहित केलेल्या रीतीने खुणा वठविण्यात येतील ; आणि

(ख) त्या त्या वेळी निर्मूलन क्षेत्र म्हणून जाहीर केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात किंवा त्या बाहेर किंवा अशा क्षेत्रांमध्ये कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या जनावरांचे स्थानांतर करण्यास प्रतिबंध करण्याचा किंवा त्याचे नियमन करण्याचा अधिकार असेल.

(२) पोट-कलम (१) यांत तरतूद केल्याप्रमाणे कोणतेही जनावर रोगसंसर्गमुक्त करण्याच्या कारणासाठी, पशुवैद्यास किंवा निरीक्षकास, कोणत्याही व्यक्तीवर लेखी नोटीस बजावून किंवा अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्रांत किंवा त्याच्या भागात विहित केलेल्या रीतीने अशी नोटीस प्रसिध्द करून तीद्वारे, असे कोणतेही

---

१. विधी अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९५८ चा मुंबई ८, अनुसूची द्वारे मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९६० चा महा. अधि. ३, कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे कलम ५ क समाविष्ट करण्यात आले.

जनावर, यथास्थिती, ज्याच्या किंवा ज्यांच्या मालकीचे असेल किंवा ताब्यात असेल त्या कोणत्याही व्यक्तीस, किंवा सर्व, व्यक्तीस, ते जनावर रोगसंसर्गमुक्त करण्याकरितां व त्यावर खूण वठविण्याकरिता नोटिशीत निर्दिष्ट करण्यात येईल त्यावेळी व त्या ठिकाणी हजर करण्यासाठी फर्माविण्याचा अधिकार आहे आणि अशा रीतीने फर्माविण्यात आल्यावर त्या नोटिशीत ज्याचा किंवा ज्यांचा उल्लेचा करण्यात आला असेल त्या व्यक्तीने किंवा त्या व्यक्तींनी त्या आदेशाचे पालन केले पाहिजे आणि तसेच त्यांनी रोगसंसर्गमुक्त करण्याचे व खुणा वठविण्याचे काम पार पाडण्यासाठी सर्व प्रकारच्या वाजवी सोयी व सहाय्य सुध्दा दिले पाहिजे :

परंतु, जे कोणतेही जनावर रोगसंसर्गमुक्त करणे असेल व ज्यावर खूण वठविणे असेल अशा कोणत्याही जनावराच्या मालकाने किंवा असे जनावर ज्याच्या ताब्यात असेल अशा कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असता, पशुवैद्यांस किंवा निरीक्षकांस, वाजवी व पुरेशा कारणांवरून, त्या जनावरांस अशा रीतीने रोगसंसर्गमुक्त करण्यापासून व त्यावर खूण वठविण्यापासून वगळून टाकण्याचा अधिकार आहे आणि त्याने, तशी विनंती करण्यात आल्यावर, अशा जनावराच्या मालकास किंवा असे जनावर ताब्यात असलेल्या व्यक्तींना ते का वगळण्यात आले या बाबतची कारणे लेखी लिहून दिली पाहिजेत.

**स्पष्टीकरण.**- या कलमाच्या कारणाकरिता, " रोगसंसर्गमुक्त करणे " म्हणजे, सेरम किंवा लस किंवा सेरम व लस ही दोन्हीही टोचून उपचार करणे "]

संसर्गदूषित जनावरे वगैरे यांची आयात, निर्यात किंवा परिवहन करणे, ती विकण्यासाठी बाजार, जत्रा वगैरे भरविणे आणि त्यांचा व्यापार करणे या गोष्टीस प्रतिषेध करण्याचा किंवा त्यांचे नियमन करण्याचा अधिकार

६. (१) [१] [ राज्य ] सरकारास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही अनुसूचित रोगाच्या प्रादुर्भावास व प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी [२] [ त्यास योग्य वाटेल अशा ] रीतीने व अशा मर्यादेपर्यंत पुढील गोष्टीस प्रतिषेध करण्याचा, त्यांवर नियंत्रण ठेवण्याचा किंवा त्योचे नियमन करण्याचा अधिकार आहे : —

(क) [१] [ राज्य ] सरकारच्या [३] [ किंवा कमिशनरच्या ] मते ज्यांच्यामुळे सांसर्गिक रोग पसरण्याचा संभव असेल अशी कोणतीही जनावरे किंवा त्यांची मृत शरीरे किंवा अशा जनावरांचा किंवा त्यांच्या मृत शरीरांचा कोणताही भाग किंवा त्याच्यासाठी वापरण्यात येणारी कोणतीही वैरण, बिछाने किंवा इतर वस्तू यांची आयात, निर्यात किंवा परिवहन करणे, अथवा

(ख) कोणत्याही निर्दिष्ट क्षेत्रांत जनावरे विकण्यासाठी त्यांचे बाजार किंवा जत्रा भरविणे, त्यांचे प्रदर्शन भरविणे किंवा इतर प्रकारे त्यांचा जमाव करणे, अथवा

(ग) संसर्गदूषित जनावरे किंवा जी मृत्यूच्या वेळी संसर्गदूषित झाली होती त्यांची मृत शरीरे किंवा अशा जनावरांसाठी वापरण्यात येणारी आणि जिच्यामुळे [१] [ राज्य ] सरकारच्या [३] [ किंवा कमिशनरच्या ] मते सांसर्गिक रोग पसरण्याचा संभव असेल अशी कोणतीही वैरण, बिछाने किंवा इतर वस्तू यांची विक्री किंवा तत्संबंधी इतर व्यवहार करणे.

१. विधी अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधी अनुकूलन, (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९५८ चा मुंबई ८, अनुसूची द्वारे मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) [१][राज्य] सरकारास, [२][किंवा कमिशनरास], राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे ज्या एका किंवा अनेक हंगामांत आणि ज्या एका किंवा अनेक मार्गानी [३][राज्य] [४][महाराष्ट्र राज्यात] जनावरांची आयात करता येईल ते हंगाम किंवा मार्ग निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे ; आणि अशा रीतीने ठरविण्यात आलेल्या हंगामाव्यतिरिक्त इतर हंगामांत आणि अशा मार्गाव्यतिरिक्त इतर मार्गानें कोणत्याही व्यक्तीने [४][महाराष्ट्र राज्यात] [५] [किंवा यथास्थिति, विभागात] जनावरांची आयात करता कामा नये.

निरोध-स्थाने स्थापन करणे.

७. (१) [१][राज्य] सरकारास [६] [किंवा त्याच्या विभागातील कमिशनरास] कलम ६, पोट-कलम (२) अन्वये ठरवून दिलेल्या मार्गावर जनावरांची तपासणी करण्यासाठी व त्याना अटकावून ठेवण्यासाठी निरोध-स्थाने ( क्वारंटाईन स्टेशन) स्थापन करण्याचा अधिकार आहे.

(२) निरोध-स्थानांत ज्यांची तपासणी केली आहे किंवा ज्यांस अटकावून ठेवले आहे अशी सर्व जनावरे ही.--

(क) असे स्थान स्वाधीन असणा-या अधिका-याच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर, कोणत्याही अनुसूचित रोगास प्रतिबंधक अशी लस टोंचली जाण्यास, आणि

(ख) विहित केलेल्या रीतीने चिन्हांकित केली जाण्यास पात्र असतील.

(३) तपासणी करणे, लस टोचणे व चिन्हांकित करणे यांसाठी निरोध-स्थानांत जनावरांस अटकावून ठेवण्याची मुदत ही विहित करण्यात येईल अशी असेल.

(४) निरोध-स्थानांत अटकावून ठेवलेली जनावरे ही, ती स्वाधीन असणा-या व्यक्तीच्या देखरेखीखाली राहातील आणि अशी व्यक्ती त्यांच्या खाण्यापिण्याबद्दल व त्यांची व्यवस्था ठेवण्याबद्दल आणि त्यांना लस टोचण्यासाठी व चिन्हांकित करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी फी देण्यास जबाबदार असेल.

(५) निरोध-स्थान स्वाधीन असणा-या अधिका-यांने, जनावरास अशा स्थानांतून सोडून देण्यात येईल त्यावेळी, जनावर स्वाधीन असणा-या व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे परवाना दिला पाहिजे आणि अशा व्यक्तीस, जनावर आपल्या स्वाधीन असेपर्यंत, निरीक्षेकाकडून किंवा पोलीस अधिका-याकडून परवाना सादर करण्याविषयी फर्माविण्यात येईल त्या त्या वेळी तो त्याप्रमाणे हजर केला पाहिजे.

संसर्गदूषित जनावरांना अलग करण्याचा आणि त्यांची तपासणी करण्याचा अधिकार.

८. (१) कोणतेही जनावर संसर्गदूषित आहे असे निरीक्षकास सकारण वाटेल तेव्हा, त्यास, लेखी आदेशाद्वारे, अशा जनावराच्या मालकास किंवा ते स्वाधीन असणा-या व्यक्तीस असे जनावर त्यावेळी ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी ठेवण्याविषयी किंवा आदेशांत निर्दिष्ट करण्यात येईल अशा अलग किंवा अलिप्त ठेवण्याच्या ठिकाणी नेण्याविषयी किंवा नेऊ देण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार आहे :

परंतु, जेव्हा असे जनावर कोणत्याही व्यक्तीच्या स्वाधीन नसेल आणि त्याचा मालक माहित नसेल किंवा असा आदेश जनावराच्या मालकास अनावश्यक विलंब न लावता जनावराच्या मालकास कळविणे शक्य नसेल किंवा असे जनावर ज्याच्या स्वाधीन आहे तो व्यक्ती या पोट-कलमान्वये आदेश पाळण्याचे नाकारतील तेव्हा, निरीक्षकास, असे जनावर धरण्याचा आणि ते अलग किंवा अलिप्त ठेवण्याच्या ठिकाणी नेण्याचा अधिकार आहे :

(२) निरीक्षकाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिल्याबद्दलचें किंवा जनावर धरल्याबद्दलचा अहवाल पशुवैद्याकडे ताबडतोब पाठविला पाहिजे.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५८ चा मुंबई ८, अनुसूची द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] मुंबई विधि अनूकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५८ चा मुंबई ८, अनुसूची द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९५८ चा मुंबई ८, अनुसूची द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

जनावरांची तपासणी करण्याचा पशुवैद्याचा अधिकार.

**९.** (१) कलम ८, पोट-कलम (२) अन्वये पाठविलेला अहवाल मिळाल्यावर, पशुवैद्याने, शक्य तितकया लवकर, अशा जनावराची आणि ज्यास अशा जनावराचा संपर्क घडला असेल किंवा जीं त्याच्या निकट सान्निध्यांत आली असतील अशा सर्व जनावरांची तपासणी केली पाहिजे ; आणि या कारणासाठी कोणत्याही जनावराची विहित केलेली कोणतीही चाचणी करण्याचा त्यास अधिकार आहे..

(२) अशी तपासणी केल्यानंतर जर–

(क) कोणतेही जनावर संसर्गदूषित नाही असे पशुवैद्याचे मत झाले तर, निरीक्षकाने, ज्या व्यक्तीस त्याच्या मतें त्याचा कब्जा मिळण्याचा हक्क असेल त्यास, ते ताबडतोब परत केले पाहिजेः

परंतु, वाजवी चौकशी केल्यानंतर, अशी व्यक्ती सापडणे शक्य नाही असे निरीक्षकाचे मत झाल्यास, त्याने असे जनावर अगदी नजीकच्या गुरांच्या कोंडवाड्यात पाठविले पाहिजे किंवा विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने त्याची व्यवस्था लावली पाहिजे,

(ख) कोणत्याही जनावरास अनुसूचित रोग झाला आहे असे लेखी प्रमाणपत्र, पशुवैद्य देईल तर, निरीक्षकाने अशा जनावरास मारून टाकले पाहिजे किंवा विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने त्याची व्यवस्था लावली पाहिजे, अथवा

(ग) कोणत्याही जनावरास रोग झालेला नाही परंतु तें संसर्गदूषित आहे असे लेखी प्रमाणपत्र पशुवैद्य देईल तर, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याची व्यवस्था लावली पाहिजे.

(३) अनुसूचित रोग झाल्याबद्दल ज्याच्याविषयीं संशय असेल अशा जनावराचा कोणत्याही जनावरास संपर्क घडला होता किंवा अशा जनावराच्या निकट सान्निध्यांत कोणतेही जनावर आले होते किंवा कसे याबद्दल पशुवैद्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.

मारून टाकण्यात आलेल्या जनावरांबद्दल नुकसानभरपाई.

**१०.** (१) कलम ९, पोट-कलम (२) अन्वये मारून टाकण्यात आलेल्या जनावराच्या मालकास विहित केलेल्या रीतीने ठरविण्यात येईल अशी नुकसानभरपाई देण्यात येईल :

परंतु,—

(१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असेलेला अपराध अशा जनावराच्या बाबतीत केल्याबद्दल दोषी ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणतीही नुकसानभरपाई देता कामा नये ; अथवा

(२) ज्या जनावरास त्याची आयात करण्यात आली त्यावेळी अनुसूचित रोग झाला होता म्हणून मारून टाकण्यात आले होते अशा कोणत्याही जनावराच्या बाबतीत कोणतीही नुकसानभरपाई देता कामा नये.

(२) कोणत्याही नुकसानभरपाई मिळण्याचा एखाद्या व्यक्तीचा हक्क किंवा अशा नुकसानभरपाईची रक्कम याविषयी पोट-कलम (१) अन्वये देण्यांत आलेला निर्णय अंतिम असेल.

संसर्गदूषित खाजगी जागा जाहीर करणे आणि पशुवैद्याकडून अशा जागांची तपासणी.

**११.** (१) कोणत्याही जमिनीवर किंवा कोणत्याही इमारतीत किंवा इतर जागेत संसर्गदूषित जनावर ठेवण्यात आले आहे असे निरीक्षकास सकारण वाटेल तर, त्याने, लेखी आदेशाद्वारे, अशी जमीन, इमारत किंवा जागा ही संसर्गदूषित जागा आहे असे ताबडतोब जाहीर केले पाहिजे. निरीक्षकाने अशा आदेशाची प्रत संसर्गदूषित जागेच्या मालकास, तिचा भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा ती ज्याच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीस दिली पाहिजे ; आणि आपण केलेल्या कारवाईचा अहवाल पशुवैद्याकडे पाठविला पाहिजे.

जी जागा कोणत्याही स्थानिक प्राधिका-याच्या किंवा रेल्वे प्रशासन प्राधिका-याच्या मालकीची असेल किंवा त्याच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थेखाली असेल आणि जीत जनावरे विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी किंवा त्यांची नेआण करतांना तात्पुरती ठेवण्यात येतात अशा कोणत्याही जागेस या पोट-कलमांतील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये पाठविलेले अहवाल मिळाल्यावर, पशुवैद्याने, शक्य तितक्या लवकर, संसर्गदूषित जागेची व तींत ठेवलेल्या जनावरांची तपासणी केली पाहिजे. अशी तपासणी केल्यानंतर, त्याने निरीक्षकाकडून देण्यात आलेला आदेश एकतर कायम केला पाहिजे किंवा रद्द केला पाहिजे.

(३) निरीक्षकाने दिलेला आदेश पशुवैद्य कायम करील तर, त्यास, संसर्गदूषित जागेपासून एक मैलापैक्षा अधिक नाही अशा त्रिज्येच्या आतील ज्या जागात जनावरे तात्पुरती किंवा अन्यथा ठेवण्यात आली असतील त्या सर्व जागा संसर्गदूषित जागा म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे. पशुवैद्याने अशा जाहीरनाम्याची लेखी नोटीस अशा जागांच्या मालकास, भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा त्या ज्यांच्या स्वाधीन असतील अशा व्यक्तींना दिली पाहिजे, त्यानंतर पशुवैद्याने ह्या कलमान्वये केलेल्या कारवाईचा अहवाल विहित प्राधिका-याकडे पाठविला पाहिजे.

(४) जर पशुवैद्य निरीक्षकाने दिलेला आदेश रद्द करील तर, अशा आदेशात निर्दिष्ट केलेली जागा संसर्गदूषित जागा असण्याचे बंद होईल ; आणि निरीक्षकाने, अशा जागेच्या मालकास भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा ती ज्यांच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीस त्याप्रमाणे नोटीस दिली पाहीजे.

**१२.** (१) जी जागा कोणत्याही स्थानिक प्राधिका-याच्या किंवा रेल्वे प्रशासन प्राधिका-याच्या किंवा पत्तन प्राधिका-याच्या मालकीची असेल किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थेखाली असेल आणि जीत जनावरे विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी किंवा त्यांची नेआण करतांना तात्पुरती ठेवण्यात येतात अशा कोणत्याही जागेत एखादे संसर्गदूषित जनावर ठेवले आहे किंवा ठेवण्यात आले आहे असे पशुवैद्यास सकारण वाटत असेल तेव्हा, त्यास, लेखी आदेशाद्वारे अशी जागा संसर्गदूषित जागा म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे.

संसर्गदूषित सार्वजनिक जागा जाहीर करणे.

(२) पशुवैद्याने –

(क) पोट-कलम (१) अन्वये त्याने दिलेल्या आदेशाची प्रादेशिक भाषेतील प्रत संसर्गदूषित जागेत त्या ठिकाणी ठळकपणे दिसेल अशा भागात लावण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

(ख) अशा आदेशाची प्रत, यथास्थिती, स्थानिक प्राधिका-याच्या कचेरीत किंवा अगदी नजिकच्या रेल्वे स्टेशनच्या स्टेशनमास्तरास किंवा असे पत्तन किंवा अशा पत्तनांतील नौवहन कचेरी ज्याच्या स्वाधीन आहे अशा अधिका-यास देण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

(ग) अशा आदेशाची प्रत, अगदी नजीकच्या पोलीस ठाण्याकडे पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे ; आणि

(घ) त्याने केलेल्या कारवाईचा अहवाल विहित प्राधिका-याकडे ताबडतोब पाठविला पाहिजे.

**१३.** (१) कलम ११, पोट-कलम (३) अन्वये किंवा कलम १२, पोट-कलम (२) अन्वये पशुवैद्याने पाठविलेला अहवाल मिळाल्यावर, विहित प्राधिका-याने त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, असा अहवाल त्यावरील आपल्या शे-यानिशी संबंधित कमिशनरास सादर केला पाहिजे.

संसर्गदूषित क्षेत्र जाहीर करण्याचा २[राज्य] सरकारचा अधिकार.

(२) विहित प्राधिका-याकडून अहवाल मिळाल्यावर, ३[कमिशनर] –

(क) कलम ११, पोट-कलम (१) किंवा (३) किंवा कलम १२, पोट-कलम (१) अन्वये केलेला जाहीरनामा फेरफारानिशी किंवा फेरफारावाचून कायम करण्याचा अधिकार आहे ; अथवा

(ख) कोणताही असा जाहीरनामा रद्द करण्याचा अधिकार आहे.

(३) जेव्हा ३[कमिशनर] कोणताही असा जाहीरनामा फेरफारानिशी किंवा फेरफारावाचून कायम करील तेव्हा, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली पाहिजे व अशा अधिसूचनेत ज्या क्षेत्रास असा जाहीरनामा यांत जे कोणतेही फेरफार करण्यात आले असतील त्यासह लागू असेल त्या क्षेत्राच्या हद्दी निश्चित करण्यात आल्या पाहिजेत आणि असे क्षेत्र संसर्गदूषित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले पाहीजे.

---

१. सन १९५८ चा मुंबई ८ अनुसूची द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९५८ चा मुंबई ८ अनुसूची द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) [1][कमिशनरास] **राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, [2][स्वतः होऊन] किंवा विहित प्राधिका-यामार्फत पशुवैद्याने [3][त्याजकडे] आणखी अहवाल सादर केल्यावर, पोट-कलम (३) अन्वये प्रसिध्द केलेल्या कोणत्याही अधिसूचनेत भर घालण्याचा, तो सुधारण्याचा, तीत फेरफार करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार आहे.

(५) पोट-कलम (३) किंवा (४) अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आल्यावर, निरीक्षकाने किंवा पशुवैद्याने संसर्गदूषित जागा म्हणून जाहीर केलेली आणि अशा अधिसूचनेत निश्चित केलेल्या संसर्गदूषित क्षेत्रांत समाविष्ट करण्यात न आलेली कोणतीही जागा संसर्गदूषित जागा असण्याचे बंद होईल ; आणि अशा जागेच्या मालकास, भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा ती ज्याच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीस निरीक्षकाने त्याप्रमाणे नोटीस दिली पाहिजे.

(६) पोट-कलम (३) किंवा (४) अन्वये काढलेल्या अधिसूचनेची प्रत संसर्गदूषित क्षेत्रातील एखाद्या ठळक जागी तेथील प्रादेशिक भाषेत लावण्याची व्यवस्था निरीक्षकाने केली पाहीजे.

(७) जेव्हा [4][कमिशनर] पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेला कोणताही जाहीरनामा रद्द करील तेव्हा, अशा जाहीरनाम्यात निर्दिष्ट केलेली कोणतीही जागा संसर्गदूषित जागा असण्याचे बंद होईल आणि अशा जाहीरनाम्याच्या प्रती ज्यांस देण्यात आल्या किंवा अशा जाहीरनाम्याच्या नोटिशी ज्यांच्यावर बजाविण्यात आल्या त्या सर्व व्यक्तीना निरीक्षकाने त्याप्रमाणे नोटीस दिली पाहीजे.

[5][(८) राज्य सरकारास, त्यास योग्य वाटतील त्या शर्तीना (कोणत्याही असल्यास) अधीन राहून या कलमान्वयेच्या आपल्या अधिकारापैकी सर्व किंवा कोणतेही अधिकार जिल्ह्याच्या कलेक्टरकडे सोपवून देण्याचा अधिकार असेल आणि अशा रीतीने अधिकार सोपविल्यानंतर, यथास्थिती, या कलमाचे सर्व तरतुदी किंवा संबंधित तरतुदी, ज्याप्रमाणे राज्य सरकारच्या संबंधात लागू होतात त्याचप्रमाणे अशा अधिका-याच्या संबंधात लागू होतील.]

संसर्गदूषित क्षेत्रांतून किंवा प्रतिषिध्द जागेतून लैसेन्सावाचून जनावरे व इतर वस्तु काढून नेणे.

**१४.** (१) जेव्हा वरील तरतुदीअन्वये कोणतेही क्षेत्र किंवा जागा संसर्गदूषित क्षेत्र किंवा जागा म्हणून जाहीर करण्यात येईल तेव्हा, कोणत्याही इसमाने असा जाहीरनामा अंमलात असेपर्यंत निरीक्षकाने दिलेल्या लैसेन्सच्या शर्तीस अनुसरुन जे असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे जिवंत किंवा मृत असो कोणतेही संसर्गदूषित जनावर किंवा जनावराचा कोणताही भाग किंवा जनावरासाठी वापरण्यात येणारे कोणतेही खाद्य, बिछाने किंवा इतर वस्तू काढून नेता कामा नये.

(२) पोट-कलम (१) मधील कोणतीही तरतूद त्या पोट-कलमात उल्लेख केलेले कोणतेही जनावर किंवा वस्तू संसर्गदूषित क्षेत्रामधून किंवा जागेमधून रेल्वेने नेण्याच्या बाबतीत लागू होणार नाही ;

परंतु, अशा कोणत्याही जनावराची किंवा वस्तुची संसर्गदूषित क्षेत्रामधून किंवा जागेमधून ने-आण होत असताना, असे जनावर किंवा वस्तू तेथे उतरविण्यात येईल तेव्हा पोट-कलम (१) च्या तरतुदींना अनुसरुन असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे असे जनावर किंवा अशी वस्तू तेथून काढून नेता कामा नये.

जनावरे वगैरे संसर्गदूषित क्षेत्रांत आणण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार.

**१५.** जेव्हा कलम १४ मध्ये उल्लेख केलेले कोणतेही जनावर किंवा वस्तू उक्त कलम १४ अन्वये दिलेल्या लैसेन्सच्या शर्तीस अनुसरुन जे असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे संसर्गदूषित क्षेत्रातुन किंवा जागेतून काढून नेण्यात येईल तेव्हा कोणत्याही निरीक्षकास किंवा पोलीस अधिका-यास असे जनावर किंवा वस्तू अशा क्षेत्रात किंवा जागेत परत नेण्याविषयी अशा जनावराच्या किंवा वस्तुच्या मालकास किंवा असे जनावर किंवा वस्तू ज्याच्या स्वाधीन असेल त्या व्यक्तीस फर्माविण्याचा अधिकार आहे :

परंतु, संसर्गदूषित जनावरांची व्यवस्था लावण्याविषयी कलम ८ अन्वये निरीक्षकास जे अधिकार असतील त्यास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

जलयाने व वाहने साफ व रोगजंतुरहित करणे.

**१६.** (१) जनावराचे परिवहन करण्यासाठी सामान्य वाहकाकडून वापरण्यात आलेले प्रत्येक जलयान किंवा वाहन विहित करण्यात येतील अशा मुदतींनी व अशा रीतीने साफ करण्यात व रोगजंतुरहित करण्यात आले पाहिजेत.

(२) असे प्रत्येक जलयान किंवा वाहन त्याच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीने निरीक्षकाकडून तसे करण्याविषयी त्यास फर्माविण्यात आले असता, असे जलयान किंवा वाहन तो निर्दिष्ट करील

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ अनुसूची द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. वरील अधिनियमाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. वरीलप्रमाणेच मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. वरीलप्रमाणे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ११ द्वारे पोट-कमल (८) जादा दाखल करण्यात आले.

अशा जागी नेले पाहिजे ; तसेच त्याने अशा जलयानाची किंवा वाहनाची तपासणी करणे निरीक्षकास शक्य व्हावे म्हणून वाजवी रीतीने आवश्यक असेल अशा वेळेपर्यंत ते थांबविले पाहिजे व एका जागी स्थिर ठेवले पाहिजे अशी तपासणी केल्यानंतर, असे जलयान किंवा वाहन आरोग्यदृष्ट्या चांगल्या स्थितीत नाही असे निरीक्षकाचे मत झाले तर, त्यास, ते विहित केलेल्या रीतीने साफ करण्याविषयी व रोगजंतुरहित करण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार आहे.

(३) कोणत्याही रेल्वेच्या डब्यास किंवा वाघिणीस या कलमांतील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

संसर्गदूषित जागा, जलयाने किंवा वाहने रोगजंतुरहित करण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार.

१७. विहित करण्यात येतील अशा नियमास अधीन राहून, पशुवैद्यास, लेखी आदेशाद्वारे, जेथे एखादे संसर्गदूषित जनावर ठेवण्यात आले असेल अशा कोणत्याही जमिनीच्या, इमारतीच्या किंवा इतर जागेच्या किंवा कोणत्याही जलयानाच्या किंवा वाहनाच्या मालकास, भोगवटा करणा-या व्यक्तीस किंवा ते ज्याच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीस, अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व अशा मर्यादेपर्यंत, अशी जमीन, इमारत, जागा, जलयान किंवा वाहन रोगजंतुरहित करुन घेण्याविषयी आणि त्याच्या आतील जोडकामे व त्यात किंवा त्याच्याजवळ आढळणा-या इतर वस्तू रोगजंतुरहित किंवा नष्ट करून घेण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार असेल.

मरणोत्तर परीक्षा करण्याचा पशुवैद्याचा अधिकार.

१८. विहित करण्यात येतील अशा नियमास अधीन राहून, पशुवैद्यास, जे कोणतेही जनावर त्याच्या मृत्युच्यावेळी संसर्गदूषित होते किंवा ज्याच्याविषयी ते संसर्गदूषित असल्याबद्दल संशय आहे अशा जनावराची मरणोत्तर परीक्षा करण्याचा किंवा करविण्याचा अधिकार आहे ; आणि या कारणासाठी, त्यास अशा जनावराचे मृत शरीर उकरुन बाहेर काढविण्याचा अधिकार आहे.

अनुसूचित रोगाची खबर देणे हे काही व्यक्तीचे कर्तव्य.

१९. जेव्हा एखाद्या जनावरास अनुसूचित रोग झाला आहे असे त्याच्या मालकास किंवा ते ज्याच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीस किंवा त्यास उपचार करण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या पशुवैद्यक व्यवसायीस सकारण वाटत असेल तेव्हा, अशा प्रत्येक मालकाने, व्यक्तीने व व्यसायीने त्या गोष्टीची खबर त्या क्षेत्रात क्षेत्राधिकार असलेल्या निरीक्षकास ताबडतोब दिली पाहिजे.

संसर्गदूषित जनावरे अलग ठेवणे हे, अशी जनावरे ताब्यात असलेल्या व्यक्तीचे कर्तव्य असेल.

[2][**१९-क.** एखाद्या जनावराच्या मालकास किंवा ते ताब्यात असलेल्या इसमास त्या जनावरास अनुसूचित रोगाचा संसर्ग झालेला आहे असे सकारण वाटत असेल तर, अशा प्रसंगी, त्याने ते जनावर, अशा रीतीने संसर्ग न झालेल्या जनावरापासून अलग अशा बंद जागेत ठेवले पाहिजे.

**स्पष्टीकरण.** या कलमाच्या कारणासाठी, "बंद जागा" या संज्ञेचा अर्थ, ज्यामुळे, अनुसूचित रोगाचा संसर्ग झालेल्या जनावराचा संसर्ग झालेल्या जनावराशी संपर्क येण्यास, किंवा, असा संसर्ग न झालेल्या जनावराचा संसर्ग झालेल्या जनावराशीं संपर्क येण्यास कार्यक्षम रीतीने प्रतिबंध होईल अशा रीतीने बंद केलेली व त्या अंतरावर असलेली कोणतीही जागा, असा आहे.]

संसर्गदूषित जनावरे ठेवण्यास किंवा ती चरु देण्यास प्रतिषेध.

२०. कोणतेही जनावर संसर्गदूषित असल्याचे ज्यास माहीत असेल अशा व्यक्तीने ते ज्या उघड्या किंवा अपरिवेष्टीत जागेत आपली जनावरे नेण्याचा इतर व्यक्तीस हक्क असेल त्या जागेत ठेवता कामा नये किंवा चरु देता कामा नये.

संसर्गदूषित जनावरे बाजार वगैरे यात आणण्यास प्रतिषेध.

२१. कोणतेही जनावर संसर्गदूषित असल्याचे ज्यास माहित असेल अशा व्यक्तीने ते कोणत्याही बाजारात, जत्रेत, प्रदर्शनात किंवा जनावरांच्या इतर जमावात आणता कामा नये किंवा आणण्याचा प्रयत्न करता कामा नये.

संसर्गदूषित जनावरांची मृत शरीरे नदी, वगैरे यात टाकण्यास प्रतिषेध.

२२. जे कोणतेही जनावर त्याच्या मृत्यूच्या वेळी संसर्गदूषित होते किंवा जे संसर्गदूषित असल्यामुळे किंवा संसर्गदूषित असल्याचा संशय असल्यामुळे मारुन टाकण्यात आले होते अशा जनावराचे मृत शरीर किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही नदीत, तलावात, कालव्यात किंवा इतर जलसंचयात किंवा समुद्रकिना-यापासून जे अंतर विहित करण्यात येईल अशा अंतराच्या आत समुद्रात कोणत्याही व्यक्तीने टाकता कामा नये किंवा टाकण्यास सांगता कामा नये किंवा टाकण्याची परवानगी देता कामा नये.

[1] सन १९५१ चा मुंबई ९, कलम ३, दुसरी अनुसूचीद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ कलम १२ द्वारे कलम १९-क समाविष्ट करण्यात आले.

जनावरांचे मृत शरीर वैध अधिकारावाचून उकरुन काढण्यास प्रतिषेध.

**२३.** जे कोणतेही जनावर त्याच्या मृत्यूच्या वेळी संसर्गदूषित होते किंवा जे संसर्गदूषित असल्यामुळे किंवा संसर्गदूषित असल्याचा संशय असल्यामुळे मारुन टाकण्यात आले होते अशा जनावराचे मृत शरीर किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीने वैध अधिकारावाचून उकरुन काढता किंवा काढविता कामा नये.

प्रवेश व तपासणी करण्याचे अधिकार.

**२४.** विहित करण्यात येतील अशा नियमास अधीन राहून, निरीक्षकास, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास देण्यात आलेले अधिकार चालविण्यासाठी व त्याजकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये बजाविण्यासाठी कोणत्याही जमिनीवर, इमारतीत किंवा इतर जागेत किंवा कोणत्याही जलयानात किंवा वाहनात प्रवेश करण्याचा व त्याची तपासणी करण्याचा अधिकार आहे.

आदेशांची अंमलबजावणी व खर्चाची वसुली.

**२५.** (१) या अधिनियमान्वये किंवा तदन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाअन्वये किंवा काढण्यात आलेल्या कोणत्याही अधिसूचनेअन्वये कोणतीही नोटीस, आज्ञा किंवा आदेश देण्यात आला असेल आणि त्या अन्वये कोणत्याही व्यक्तीस त्याच्या मालकीच्या किंवा त्याच्या भोगवट्यात असलेल्या किंवा त्याच्या स्वाधीन असलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत कोणत्याही उपाययोजना किंवा कोणत्याही गोष्टी करण्याविषयी फर्माविण्यात आले असेल तेव्हा ज्या वाजवी मुदतीत यथास्थिति; अशा उपाययोजना किंवा अशा गोष्टी केल्या पाहिजेत ती मुदत अशा नोटिशीत, आज्ञेत किंवा आदेशात निर्दिष्ट करण्यात आली पाहिजे.

(२) जर अशा उपाययोजना किंवा गोष्टी अशा रीतीने निर्दिष्ट केलेल्या मुदतीत करण्यात आल्या नाहीत तर अशी नोटीस, आज्ञा किंवा आदेश देणा-या प्राधिका-यास अशा उपाययोजना किंवा गोष्टी संबंधित व्यक्तीच्या खर्चाने करुन घेण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही उपाययोजना किंवा गोष्टी केल्याबद्दल झालेला खर्च हा, संबंधित व्यक्तीकडून, न्यायालयाने केलेला दंड वसूल करण्यासाठी दंड प्रक्रिया संहिता, १८९८ हीत ज्या रीतीची तरतूद करण्यात आली आहे त्या रीतीने, जणू असा खर्च न्यायालयाने केलेला दंड आहे असे समजून, वसूल करता येईल.

जनावर संसर्गदूषित आहे किंवा नाही त्याविषयी निर्णय देण्याचा पशुवैद्याचा अधिकार.

**२६.** एखादे जनावर संसर्गदूषित आहे किंवा नाही असा कोणताही प्रश्न या अधिनियमान्वये उद्‌भवल्यास त्याचा निर्णय पशुवैद्याने केला पाहिजे ; व त्याचा निर्णय अंतिम असेल.

शास्ती.

**२७.** [१] [जो कोणी —

(क-एक) कलम ५-क अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेच्या अटींचे पालन करण्यात कसूर करील किंवा त्याचे उल्लंघन करील, किंवा उक्त कलमाद्वारे किंवा तदन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा दिलेल्या निदेशांचे पालन करण्यात कसूर करील, अथवा]

(एक) कलम ६ अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत निर्दिष्ट केलेला कोणताही निदेश पाळण्यात कसूर करील किंवा अशा अधिसूचनेत असलेल्या अटीचे उल्लंघन करील किंवा उक्त कलमाचे पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करुन कोणत्याही जनावराची आयात करील, अथवा

(दोन) कलम ७, पोट-कलम (४) अन्वये जनावरास खाणे-पिणे देण्यात किंवा त्याची व्यवस्था ठेवण्यात कसूर करील किंवा उक्त कलमाचे पोट-कलम (५) अन्वये परवाना सादर करण्यात कसूर करील, अथवा

(तीन) कलम ८, पोट-कलम (१) अन्वये निरीक्षकाने दिलेला आदेश पाळण्यात कसूर करील, अथवा

---

[१] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कलम १३(अ) द्वारे मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(चार) कलम १४ च्या तरतूदींचे उल्लंघन करून संसर्गदूषित क्षेत्रांतून किंवा जागेतून कोणतेही जनावर किंवा वस्तू काढून नेईल, अथवा

(पाच) कलम १५ अन्वये निरीक्षकाने किंवा पोलीस अधिका-याने दिलेला कोणताही निदेश पाळण्यात कसूर करील, अथवा

(सहा) कलम १६, पोटकलम (१) मध्ये सांगितल्याप्रमाणे, जनावरे नेण्यासाठी वापरण्यात आलेले कोणतेही जलयान किंवा वाहन विहित केलेल्या रीतीने साफ किंवा रोगजंतुरहित करण्यात कसूर करील किंवा उक्त कलमाचे पोटकलम (२) अन्वये तसे करण्याविषयी फर्माविण्यात आले असता, कोणतेही जलयान किंवा वाहन थांबविण्यात व एका जागी स्थिर ठेवण्यात कसूर करील, अथवा

(सात) कलम १७ अन्वये पशुवैद्याने दिलेला आदेश पाळण्यात कसूर करील, अथवा

(आठ) कलम १९ मध्ये सांगितल्याप्रमाणे एखादे जनावर संसर्गदूषित असल्याची खबर देण्यात कसूर करील, अथवा

[1][(आठ-क) कलम १९ क अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे संसर्गदूषित जनावर अलग ठेवण्यात कसूर करील, अथवा]

(नऊ) कोणतेही जनावर संसर्गदूषित असल्याचे माहीत असता, त्यास कलम २० च्या तरतुदींचे उल्लंघन करून ठेवील किंवा चरू देईल, अथवा

(दहा) कोणतेही जनावर संसर्गदूषित असल्याचे माहीत असता, त्यास कलम २१ च्या तरतुदींचे उल्लंघन करून आणील किंवा आणण्याचा प्रयत्न करील, अथवा

(अकरा) जे कोणतेही जनावर त्याच्या मृत्यूच्या वेळी संसर्गदूषित होते किंवा जे संसर्गदूषित असल्यामुळे किंवा संसर्गदूषित असल्याचा संशय असल्यामुळे मारून टाकण्यात आले होते अशा जनावरांचे मृत शरीर किंवा त्याचा कोणताही भाग कलम २३ च्या तरतुदींचे उल्लंघन करून उकरून काढील किंवा काढवील.

[2][तर, त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, पहिल्या दोष सिध्द झाल्याच्या बाबतीत, जास्तीत जास्त शंभर रुपये, दंडाची शिक्षा होईल आणि दुस-या व नंतरच्या दोषसिध्दीच्या बाबतीत–मग अशी दोषसिध्दी झाल्यावर या कलमाच्या त्याच खंडान्वये किंवा कोणत्याही इतर खंडान्वये झालेली असो–पराकाष्ठा तीन महिने पर्यंतच्या मुदतीच्या साध्या कैदेची किंवा जास्तीत जास्त पांचशे रुपये द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्हीही शिक्षा होतील.]

संसर्गदूषित जनावरांचे मृत शरीर नदी वगैरे यांत टाकण्याबद्दल शास्ती.

**२८.** जो कोणी कलम २२ च्या तरतुदींचे उल्लंघन करून, जे कोणतेही जनावर त्याच्या मृत्यूच्या वेळी संसर्गदूषित होते किंवा जे संसर्गदूषित असल्यामुळे किंवा संसर्गदूषित असल्याचा संशय असल्यामुळे मारून टाकण्यात आले होते अशा जनावरांचे मृत शरीर किंवा त्याचा कोणताही भाग कोणत्याही नदीत, तलावात, कालव्यात किंवा जलसंचयात किंवा समुद्रकिना-यापासून जे अंतर विहित करण्यात येईल अशा अंतराच्या आत समुद्रात टाकील किंवा टाकण्यास सांगेल किंवा टाकण्याची परवानगी देईल त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, पहिल्या दोषसिध्द झाल्याच्या बाबतीत जास्तीत जास्त सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा जास्तीत जास्त शंभर रूपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील आणि नंतरच्या दोष सिध्द झाल्याच्या बाबतीत, जास्तीत जास्त सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा जास्तीत जास्त पाचशे रुपये द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

---

१. सन १९६० चा महा. अधिनियम क्रमांक ३, कलम १३ (ब) द्वारे खंड (८-क) समाविष्ट करण्यात आला.
२. वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

त्रास देण्यासाठी प्रवेश किंवा तपासणी करण्याबद्दल किंवा जनावर धरण्याबद्दल शास्ती.

**२९.** (१) जो कोणी या अधिनियमान्वये नेमलेला जो कोणताही निरीक्षक किंवा पशुवैद्य त्रास देण्यासाठी व अनावश्यक रीतीने कोणत्याही जमिनीवर, इमारतींत किंवा इतर जागेत किंवा कोणत्याही जलयानात किंवा वाहनात प्रवेश करील किंवा त्याची तपासणी करील किंवा कोणतेही जनावर धरील किंवा अटकावून ठेवील त्यास, दोषी ठरविण्यात आले असता जास्तीत जास्त सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा जास्तीत जास्त पांचशे रुपये द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) या कलमाअन्वये करावयाचा कोणताही खटला, ज्या दिनांकास अपराध घडला त्या दिनांकापासून तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतर दाखल करता कामा नये.

निरीक्षकास व पशुवैद्यास साहाय्य करणे अधिका-यांस भाग असणे.

**३०.** सर्व ग्राम अधिका-यास आणि महसूल विभागाच्या, कृषि विभागाच्या व पशुवैद्यकीय विभागाच्या सर्व अधिका-यांस पुढील गोष्टी करणे भाग आहे—

(क) त्या क्षेत्रात क्षेत्राधिकार असलेल्या पशुवैद्यास व निरीक्षकास त्या क्षेत्रातील जनावरांमध्ये एखाद्या अनुसूचित रोगांचा फैलाव झाल्याबद्दलची माहिती ताबडतोब देणे ;

(ख) रोगाच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे ; आणि

(ग) पशुवैद्यास व निरीक्षकास ह्या अधिनियमांचे उपबंध अंमलात आणण्यासाठी साहाय्य करणे.

अटक करण्याचा व जप्त करयाचा अधिकार.

[१][**३१.** "(१) उप-निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-यास, पशुवैद्याकडून किंवा निरीक्षकाकडून ज्यांस अटक करण्याबाबत आदेश मिळाला असेल त्या कोणत्याही व्यक्तीस फौजदारी न्यायाधिशाच्या आदेशाविना व आज्ञापत्र नसतानाही अटक करण्याचा अधिकार आहे; मात्र अशा आदेशात; ज्यास अटक करावयाची असेल ती व्यक्ती अणि या अधिनियमांन्वये शिक्षेस पात्र असलेल्या ज्या कोणत्याही अपराधाशी त्याचा संबंध असेल तो अपराध निर्दिष्ट केलेला असला पाहिजे.

(२) अशा पोलीस अधिका-यास, ज्या जनावराच्या संबंधात असा अपराध करण्यात आला असेल ते जनावर जप्त करण्याचा अधिकार असेल आणि त्याने, कोणताही विलंब न लावता, त्या जनावराच्या अभिरक्षेबाबत न्यायिक फौजदारी न्यायाधिशाचे आदेश मिळविले पाहिजेत.]"

फौजदारी न्यायाधिशाचा क्षेत्राधिकार.

**३२.** प्रेसिडेन्सी फौजदार न्यायाधीश, पहिल्या वर्गाचा फौजदार न्यायाधीश किंवा [२][राज्य] सरकारने याबाबत खास अधिकार दिलेला दुस-या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश याव्यतिरिक्त इतर कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने, या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता कामा नये.

नुकसान भरपाई मागण्यास मनाई.

**३३.** कलम १० मध्ये जी तरतुद केली असेल ती खेरीजकरून, कोणत्याहि व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये कोणतेही जनावर मारून टाकल्याबद्दल किंवा कोणतीही वस्तू नष्ट केल्याबद्दल किंवा या अधिनियमाअन्वये वैधरीत्या केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे झालेले कोणतेही नुकसान, दुखापत किंवा गैरसोय याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

अधिका-यांनी सरकारच्या आदेशास अधीन राहून काम करणे.

**३४.** सर्व अधिका-यांनी, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यांस देण्यात आलेले अधिकार व त्यांजकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे जे आदेश [३][राज्य] सरकार वेळोवेळी देईल त्यांस अनुसरून चालविले पाहिजेत व बजाविली पाहिजेत.

---

१. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १४ द्वारे ३१ कलमाऐवजी कलम ३१ दाखल करण्यात आले.
२. विधी अनुकूलन आदेश, १९५० मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. सन १९६० चा महा. अधिनियम क्रमांक ३ कलम १५ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**३५.** या अधिनियमाअन्वये किंवा तद्नुसार केलेल्या नियमांअन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा हेतू आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करणार नाही.

*या अधिनियमाअन्वये केलेल्या कारवाईचे संरक्षण.*

**३६.** (१) [२][राज्य] सरकारास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करण्याचा अधिकार आहे.

*नियम.*

(२) विशेष करून व वरील तरतुदींच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, [३][असे नियम पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी करता येतील :–

(क) (एक) कलम ५-क चे पोट-कलम (१) या अन्वये खुणा वठविण्याची रीत व पोट-कलम (२) अन्वये नोटिसा बजाविण्याची किंवा प्रसिध्द करण्याची रीत ;]

(एक) कलम ७, पोट-कलम (२) अन्वये जनावरे चिन्हांकित करण्याची रीत, पोट-कलम (३) अन्वये अटकावून ठेवण्याची मुंदत, पोट-कलम (४) अन्वये लस टोचण्याबद्दल व चिन्हांकिं करण्याबद्दल द्यावयाच्या फीची रक्कम आणि पोट-कलम (५) अन्वये द्यावयाच्या परवान्यांचा नमुना ;

(दोन) कलम ९, पोटकलम (१) अन्वये जनावराची जी चाचणी करता येईल ती चाचणी आणि पोट-कलम (२) अन्वये ज्या रीतीने जनावराची व्यवस्था करता येईल ती रीत ;

[२][(५) या कलमांन्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर, तीस दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवस ठेवण्यात आले पाहिजेत आणि ते, अशा रीतीने ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतपुढील अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यांत जे फेरफार करील त्या फेरफारांना अधीन असतील.]

[३][**३७.** राज्य सरकारास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जनावराला होणारा कोणताही रोग अनुसूचित निर्दिष्ट करण्याचा अधिकार आहे आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर, उक्त रोग अनुसूचित समाविष्ट करण्यात आल्यानंतर त्या अनूसूचीची सुधारणा करण्यात आली आहे असे समजण्यात आले पाहिजे.

*राज्य सरकारचा अनुसूचीत वाढ करण्याचा अधिकार.*

**३८.** कलम २, पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे, राज्याच्या विदर्भ विभागात, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचा प्रारंभ झाल्यावर, त्या विभागास लागू असलेला मध्यप्रांत व व-हाडचा जनावरांच्या रोगांबाबत अधिनियम, १९३४, हा रद्द होईल :

*सन १९३४ चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम रद्द करणे आणि बचाव.*

परंतु, सदरहू अधिनियम अशा रीतीने रद्द करण्यात आल्यामुळे,–

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या त्या अधिनियमाचा पूर्वीचा अंमल यास; किंवा

(ख) अशा रीतीने रद्द केलेल्या सदरहू अधिनियमान्वये संपादन केलेल्या कोणत्याही हक्कास अथवा पत्करलेल्या जबाबदारीस ; किंवा

(ग) अशा रीतीने रद्द केलेल्या त्या अधिनियमाच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदी विरुध्द केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेल्या दंडास, केलेल्या जप्तीस किंवा शिक्षेस ; किंवा

(घ) उपरोक्त कोणताही असा हक्क, जबाबदारी, दंड, जप्ती किंवा शिक्षा यांबाबतच्या कोणत्याही चौकशीस, वैध कारवाईस किंवा उपाययोजनेस ;

---

१. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १४ द्वारे ३१ कलमाऐवजी हे कलम ३१ दाखल करण्यात आले.
२. विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. सन १९६० महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ कलम १५ (अ) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

बाधा येणार नाही; आणि जणू त्या विभागात या अधिनियमांचा प्रारंभ झाला नव्हता असे समजून, अशी कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना करता येईल, चालू ठेवता येईल व अंमलात आणता येईल आणि कोणताही असा दंड, जप्ती व शिक्षा करता येईल.]

(तीन) कलम १० अन्वये नुकसानभरपाई ठरविण्याची रीत ;

(चार) कलमे ११, १२ व १३ यांच्या प्रयोजनाकरिता विहित करावयाचा प्राधिकार ;

(पाच) कलम १६ अन्वये ज्या मुदतींनी व ज्या रीतीने जलयाने व वाहने साफ केली पाहिजेत व रोगजंतू रहित केली पाहिजेत त्या मुदती व ती रीत ;

(सहा) कलम १७ अन्वये जमीन, इमारत किंवा इतर जागा किंवा जलयान किंवा वाहन रोगजंतुरहित करणे ;

(सात) कलम १८ अन्वये मरणोत्तर परीक्षा करणे ;

(आठ) कलम २२ अन्वये समुद्रकिना-यापासून ज्या अंतराच्या आत मृतशरीरे टाकता कामा नये ते अंतर ;

(नऊ) कलम २४ अन्वये निरीक्षकाच्या अधिकाराचे नियमन करणे.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये नियम करताना, [1][राज्य] सरकारास अशी तरतूद करण्याचा अधिकार आहे की, कोणत्याही व्यक्तीने अशा नियमांचा भंग केल्यास तीने पहिल्या दोष सिध्द झाल्याच्या बाबतीत, जास्तीत जास्त रु. ५० द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि दुस-या किंवा नंतरच्या दोष सिध्दी झाल्याच्या बाबतीत, रु. १०० द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(४) या कलमाअन्वये केलेले नियम राजपत्रात प्रसिध्द केले पाहिजेत. परंतु, तत्पूर्वी ते आगाऊ प्रसिध्द करण्यात आले पाहिजेत.

[2][तर, त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, पहिल्या दोष सिध्द झाल्याच्या बाबतीत, जास्तीत जास्त शंभर रुपये, दंडाची शिक्षा होईल आणि दुस-या व नंतरच्या दोषसिध्दी झाल्याच्या बाबतीत--मग अशी दोषसिध्दी या कलमाच्या त्याच खंडान्वये किंवा कोणत्याही इतर खंडान्वये झालेली असो--पराकाष्ठा तीन महिने पर्यंतच्या मुदतीच्या साध्या कैदेची किंवा जास्तीत जास्त पांचशे रुपये द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्हीही शिक्षा होतील.]

## अनुसूची

१. जनावरांच्या देवी किंवा बुळकांडी.

२. लाळ, खुरकत, पायलाग.

३. गळसूज, नरडपे.

४. घाट्या, फ-या.

५. गोळी किंवा फांशी.

६. क्षय.

७. जॉनचा रोग.

८. श्वानदंश.

[4][९. दक्षिण आफ्रिकेतील घोड्यांना होणारा रोग]

---

१. विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम १५(ब) पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.
३. वरल अधिनियमाच्या कलम १६ द्वारे कलमे ३७ व ३८ समाविष्ट करण्यात आली.
४. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे ही नोंद जादा, दाखल करण्यात आली.

शा. मु. औ.-(एच) २९२-६,०५०-१२-२००६.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद.